**महाराष्ट्र शासन**

**क्रमांक-**संकीर्ण-२००७/२९८/प्र.क्र.४१/०७/२०ब,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२,
दिनांक- १८ मे, २००७

प्रति,

सर्व मंत्रालयीन विभागाचे अ.मु.स./प्र.स./सचिव,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.

विषय- एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणेबाबत तसेच परिक्षा उत्तीर्ण न झाल्याने त्यांच्या वेतनवाढी रोखणेबाबत.

संदर्भ- १) शासन निर्णय क्र-मभाप-१०८७/१४/प्र.क्र.२/८७/२०, दिनांक ३०/१२/१९८७.
२) शासनअधिसूचना- क्र-मभाप-१०९७/१६५२/प्र.क्र.७२/९७/२०ब, दिनांक ०७/०२/२००१.
३) शासन निर्णय क्र-मभाप-१०९२/१५७०/प्र.क्र.१४३/९२/२०,दिनांक ०१/०१/१९९३.
४) शासन निर्णय क्र-मभाप-१००२/प्र.क्र.३८/०२/२०ब, दिनांक ०८/०५/२००३.

**महोदय**,

एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण केली नसल्यामुळे एका प्रकरणी सेवानिवृत्ती उपदानातून वसूल करण्यात येणाऱ्या रकमेच्या अनुषंगाने मा. उप लोक आयुक्त यांचेकडे तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीवर सुनावणीच्यावेळी क्षेत्रिय कार्यालयाने असे सांगितले कि, एतदर्थ मंडळाच्या मराठी / हिंदी भाषा परीक्षेबाबतचे सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित करण्यात आलेले दिनांक ३०/१२/१९८७, दिनांक ७/२/२००१, दिनांक १/१/१९९३ व दिनांक ८ मे २००३ चे आदेश / अधिसूचना/ परिपत्रक त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे किंबहूना त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले नसल्यामुळे संबंधीत प्रकरणावर वेळीच कार्यवाही करता आली नाही. सदर सुनावणीच्या वेळी सामान्य प्रशासन विभागाने असे निदर्शनास आणून दिले कि, सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेले उपरोक्त आदेश सर्व मंत्रालयीन विभागांना तसेच विभाग प्रमुखांना चिन्हांकित केलेले आहेत. संबंधित मंत्रालयीन विभागांनी तसेच त्यांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुखांनी सदर आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याची अंमलबजावणी करणे ही जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखाची तसेच मंत्रालयीन विभागाची आहे. याबाबतचा स्पष्ट उल्लेखही दिनांक

८/५/२००३ च्या आदेशामध्ये केलेला आहे. मात्र मंत्रालयीन विभागांनी सदर आदेश क्षेत्रिय कार्यालयाच्या किंवा संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास न आणल्यामुळे अशी प्रकरणे उपस्थित होत आहेत.

२. याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांना पुनश्च अशा सूचना देण्यात येत आहेत की , एतदर्थ मंडळाच्या मराठी/हिंदी भाषा परीक्षेच्या संबंधात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश अधिसूचना/परिपत्रक सर्व संबंधितांच्या पुन्हा एकदा निदर्शनास आणून द्याव्यात. तसेच यापूढे दर दोन वर्षानी आस्थापनेवरील सर्व कर्मचारी/अधिकारी यांच्या निदर्शनास त्या सूचना आणून त्यांना मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण होणे ही कर्मचाऱ्यांची/ अधिकाऱ्यांची वैयक्तिक जबाबदारी असून सदरहू परीक्षा उत्तीर्ण होणे सक्तीचे असल्याबाबतची जाणीवही करुन द्यावी.

वरील सूचना सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या निदर्शनास आणाव्यात. या संदर्भामध्ये नमुद केलेले सर्व शासन निर्णय यापूर्वीच महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले आहेत, याचीही प्रशासकीय विभागाने नोंद घ्यावी.

हे पत्र, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००७०५१९१६०८०५००१ आहे.

आपला,
सही/-
( अ.ना.कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रतः-**

१) मा.लोक आयुक्त कार्यालय, नवीन प्रशासन भवन, १ ला मजला, मादाम कामा रोड, मुंबई-३२, यांना त्यांचे पत्र क्रमांक-उलोआ/कॉम/४५१२/०६(टे.२१), दिनांक १७/०३/२००७ चे संदर्भात सादर.

२) निवडनस्ती.